# <u>AIA PGET - २०१९</u>

## महाविद्यालयीन स्तरावर करण्यात येणाऱ्या आयुर्वेद/होमिओपॅथी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेकरीता प्राचार्य व निरीक्षक यांना आवश्यक मार्गदर्शक सुचना

१) आपल्या महाविद्यालयातील रिक्त जागांचा तपशिल www.mahacet.org या संकेतस्थळावर दिनांक २८/१०/२०१९ रोजी रात्री ०८:०० वाजेनंतर प्रसिध्द करण्यात येईल. सदर तपशिलामध्ये नमुद केलेल्या जागांसाठीच प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्यांनी त्यांचे महाविद्यालय कार्यालय सार्वजनिक सुट्टिच्या दिवशी चालू ठेवण्यात यावे.

३) प्रवेश प्रक्रियेबाबत आवश्यक असणाऱ्या सूचना विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या विविध ठिकाणच्या दर्शनी भागात लावण्यात याव्यात.

४) AIA PGET - २०१९ पात्र उमेदवारांनी दिनांक २९/१०/२०१९ रोजी ते दिनांक ३०/१०/२०१९ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत महाविद्यालयात केलेले अर्ज स्विकारावेत व त्यांना त्याची पोच द्यावी. <u>त्यानंतर कोणतेही अर्ज स्विकारण्यात येऊ नये.</u> प्राप्त अर्जाची नोंद नोंदवहीत घेण्यात यावी.

५) ज्या विद्यार्थ्यांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता www.mahacet.org या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन करुन मुळ प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रिया केली आहे, अशा उमेदवारांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच **ऑल इंडिया कोट्यातून व राज्य सीईटी कक्षाकडून यापूर्वी प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.**

६) ऑल इंडिया कोट्यातून आणि राज्य स्तरीय कोट्यातून ज्या विद्यार्थ्यांनी त्यांचा प्रवेश त्यांना निवड झालेल्या महाविद्यालयात निश्चित केला आहे, असे विद्यार्थी वगळून ज्या ज्या विद्यार्थ्यांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेशाकरीता www.mahacet.org या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन केलेले आहे व मुळ प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रिया पुर्ण केली आहे, अशाच पात्र उमदेवाराना प्रथम प्राधान्य देऊन त्या त्या महाविद्यालयाने प्राप्त होणाऱ्या अर्जाची यादी व त्यानुषंगाने तयार केलेली गुणवत्ता यादी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

७) महाविद्यालयीन स्तरावर प्राप्त प्रवेश प्रक्रियेकरीता महाविद्यालयाने नियुक्त निरीक्षकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन प्राप्त झालेल्या अर्जातून रजिस्ट्रेशन केलेल्या उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी सर्व समिती सदस्यांच्या स्वाक्षरीने तयार करुन दिनांक ३०/१०/२०१९ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता प्रसिध्द करावी. तद्नंतर एक तासाच्या कालावधीत उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास ते स्विकृत करुन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व तद्नंतर एक तासाच्या कालावधीत उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास ते स्विकृत करुन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व तद्नंतर अंतिम गुणवत्तायादी प्रसिध्द करण्यात यावी. तसेच महाविद्यालयात रिक्त जागांच्या प्रवर्गानुसार निवडयादी प्रसिध्द करण्यात यावी. तसेच उर्वरित अर्जदारांची प्रतिक्षाधीन यादी तयार करुन सदर यादी दिनांक ३०/१०/२०१९ रोजी सायंकाळी ०७.०० वाजेपर्यंत महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी.

८) दिनांक ३१/१०/२०१९ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०२.०० या वेळेत महाविद्यायात रिक्त जागांवर प्रसिध्द केलेल्या प्रवर्गानुसार निवडयादीतील उमेदवारांचे प्रवेश करण्यात यावेत. **ज्या उमेदवारांकडे प्रवेशासाठीची सर्व आवश्यक मुळ प्रमाणपत्र उपलब्ध नसतील अशा उमेदवारांना प्रवेश देण्यात येऊ नये. तसेच उमदेवार स्वतः उपस्थित असल्यास त्याचा प्रवेश करण्यात यावा, उमेदवाराचे प्रतिनिधीमार्फत प्रवेश करण्यात येऊ नये.**

उमेदवारांच्या किमान आवश्यक पात्रता व प्रमाणपत्राबाबतची माहिती AIA PGET - २०१९ च्या माहितीपुस्तिकेत नमुद करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

९) दिनांक ३१/१०/२०१९ रोजी दुपारी ०२.०० वाजल्यानंतर उपस्थित असलेल्या प्रतिक्षाधीन यादीतील उमेदवारांमधून प्रथम घटनात्मक आरक्षण प्रवर्गातील जागा रिक्त असल्यास घटनात्मक आरक्षण प्रवर्गातील गुणवत्ताधारक उमेदवारांमधून प्रवेश करण्यात यावा. सदर गुणवत्तायादीमध्ये संबंधित प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास **AIA PGET - २०१९ च्या माहिती पुस्तिकेतील परिशिष्ट - अ** मधील **नियम क्र.७** नुसार **इंटरसे** प्रवेशफेरी राबविण्यात यावी.

दुपारी ०३.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेमध्ये उपस्थित उमेदवारास महाविद्यालयातील प्रस्तावित हॉलमध्ये प्रवेश देण्यात यावा. त्यांची स्वतंत्र रजिस्टरमध्ये उपस्थिती नोंद करुन स्वाक्षरी घ्यावी. स्वाक्षरीच्या पुढे वेळ टाकावी. सायं. ०६.०० वाजता संस्थेच्या प्राचार्यांनी नियुक्त निरिक्षकासमोर रजिस्टर बंध करुन दोघांनीही स्वाक्षरी कराव्यात. सायं. ०६.०० वाजेनंतर नवीन विद्यार्थ्यांना प्रवेशकक्षाच्या हॉलमध्ये प्रवेश देण्यात येऊ नये व उपस्थित विद्यार्थ्यांमधुन प्रवेश प्रक्रिया नियमांनुसार पुर्ण करावी. तद्नंतरही घटनात्मक आरक्षणाच्या जागा शिल्लक राहिल्यास त्या जागा खुल्या प्रवर्गातील उपलब्ध जागांमध्ये समाविष्ठ करण्यात करुन हॉलमध्ये उपस्थित उमेदवारांमधून गुणानुक्रमानुसार प्रवेश करण्यात यावेत.

१०) अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेशाकरीता सक्षम प्राधिकारी यांचे स्तरावर "इंटरसे" झालेला असल्यामुळे पुन्हा इंटरसे प्रक्रिया राबविण्याची आवश्यकता नाही, तथापि, सदर महाविद्यालयातील प्रवेश करताना सर्वप्रथम रजिस्टर्ड अप्लसंख्यांक संवर्गातील उमेदवारांमधून जागा भरण्यात याव्यात. सदर संवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास त्या जागा रजिस्टर्ड यादीतील खुल्या प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात याव्यात.

११) ज्या उमेदवारांकडे AIA PGET - २०१९ नियमावलीमध्ये नमुद केलेली सर्व मुळ प्रमाणपत्रे असतील अशाच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा. तसेच त्या विद्यार्थ्यांकडून सर्व मुळ प्रमाणपत्रांची व महाविद्यालय सोडल्याचा मुळ दाखला व या सर्वांची एक छायांकित प्रत आपल्याजवळ ठेवण्यात यावी. जर एखाद्या उमेदवाराने त्याला मिळत असलेल्या प्रवेश नाकारल्यास त्याबाबत त्याचेकडून स्वहस्ते लेखी स्वरुपात अर्ज नोंद करुन स्वाक्षरी घेण्यात यावी.

१२) प्रवेशित विद्यार्थ्यांचा तसेच रिक्त जागांचा तपशिल दिनांक ३१/१०/२०१९ रोजी राज्य सीईटी कक्षाच्या College Feedback मधील Institutional Level Round मध्ये लॉगईन करुन सादर करण्यात यावा. तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी नियुक्त निरीक्षक

व महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या स्वाक्षरी व शिक्यासह आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष आणि संचालक, आयुष यांना ईमेलव्दारे पाठवावी.

१३) महाविद्यालयाने विद्यार्थ्याकडून सर्व शैक्षणिक शुल्क धनाकर्ष/धनादेश/रोख स्वरुपात स्विकारण्यात यावे व त्याची पोहोच पावती संबंधित विद्यार्थ्यास देणे बंधनकारक राहील.

१४) प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक तेव्हा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात यावा.

विशेष सूचना -

**I.** अधिष्ठाता/प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांकरीता, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर असलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच वेळोवेळी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाची संकेतस्थळ बघत रहावी. अधिष्ठाता/प्राचार्य यांची स्वाक्षरी नसलेली कोणतीही कागदपत्रे, निवड याद्या व प्रवेश यादी इ.ग्राह्य धरले जाणार नाही.

**II.** तयार करण्यात आलेल्या प्रत्येक यादीवर (गुणवत्ता यादी, निवड यादी, प्रतिक्षा यादी, व अपात्र विद्यार्थ्यांची यादी) अधिष्ठाता/प्राचार्य यांचे बरोबरच नियुक्त निरीक्षकांची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.

**III.** महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रिया हॉलमध्ये संगणक, इंटरनेट, प्रिंटर व स्कॅनर इ.व्यवस्था ठेवण्यात यावी. ग्रामिण भागातील भारनियमन शक्यता पाहून जनरेटरची व्यवस्था करण्यात यावी.

**IV.** सदरहू प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयाच्या कार्यालयातील स्वतंत्र कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन घेण्यात यावा.

**V.** महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दारापासून ते प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणाऱ्या ठिकाणापर्यंत ठिकठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे लावून संपूर्ण प्रवेश प्रक्रियेबाबतचे छायाचित्रण करुन त्याच्या दोन सी.डी./पेनड्राईव्ह आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियुक्त निरीक्षकासह उपलब्ध करुन द्याव्यात.

**VI.** वरील सर्व सूचनांचे पालन काटेकोरपणे करण्याची सर्व जबाबदारी नियुक्त निरीक्षकांची राहील. त्यास संस्था चालकांकडून अडथळा निर्माण झाल्यास देण्यात आलेल्या प्रवेश रद्द करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे राहतील.

**VII.** संबंधित प्रवेश प्रक्रियेचा सविस्तर तपशिल व अहवाल निरीक्षकाच्या स्वाक्षरीने २ हार्ड कॉपी आणि २ सॉप्ट कॉपी मध्ये ( १ हार्ड व सॉप्ट कॉपी संचालक, आयुष संचालनालय आणि दुसरील हार्ड व सॉप्ट कॉपी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास) सादर करावी. तसेच त्याचा अहवाल **maharashtra.cetcell@gmail.com** व **directorayurvedmaha@gmail.com** या ई-मेलवर पाठविण्यात यावा.

*************